लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित)
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार
ता.राहाता जि.अहमदनगर पिन-४१३७१०



- एस.वाय.बी.ए.(मराठी) : मराठी भाषिक संज्ञापन कौशल्य
- मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम –जून २०१९ पासून
- अनिवार्य अभ्यासक्रम
- पहिले सत्र
- MIL2(2)
- प्रगत भाषिक कौशल्ये
- ०१. संवाद


- * प्रा.डॉ.राजेंद्र वडमारे
- मराठी विभाग प्रमुख

# संवाद कौशल्ये

# व्याख्या

- संवाद म्हणजे विविध प्रकारचे विचार, माहिती, कल्पना, भावना आणि जाणिवांचे आदान प्रदान
- संवाद म्हणजे एकाकडून दुसऱ्याकडे–अनेकांकडे आपले म्हणणे अनुरूप माध्यमांद्वारे पोहचविणे

# संवादाचे स्वरूप

माहिती पाठविणारा

माहिती, विचार, भावना

भाषा,लिखित, चित्र, हावभाव

माहिती किंवा संदेश श्रवण करुन प्रतिसाद देणारा

प्रेषक → संदेश → माध्यम → ग्राहक

प्रत्याभरण/ प्रतिसाद

# भाषिक कौशल्य (Skill)

- व्याख्या


“कोणत्याही शास्त्राचे, कलेचे, हस्तकलेचे सादरीकरण व व्यावहारिक जीवनात उपयोजन करण्याची कला म्हणजे कौशल्य”

- गरज:

आपल्या मनातील आशय दुसऱ्यापर्यंत योग्यपणे पोहचविण्यासाठी व त्याचे म्हणणे आपण योग्यपणे समजून घेण्यासाठी

# मूलभूत भाषिक (संवाद) कौशल्य (Skill)

- संवाद कौशल्यांनाच भाषिक कौशल्य म्हणतात. ती एकूण चार आहेत. त्या आधारे आपण माहिती व विचारांचे आकलन व आविष्करण करतो. सरावाने ती आत्मसात करता येतात.



# भाषण- संभाषणातील भाषेचे स्थान

- भाषेचा हेतू दोन व्यक्तींना एकत्र आणणे हाच असतो

**भाषा कशी असावी**

- **अर्थवाहक**
  - प्रतिमा
  - प्रतीके
  - कोटी
- **आशयपूर्ण**
  - म्हणी
  - वाक्प्रचार
  - सुभाषिते
- **भावगर्भ**
  - अलंकार
  - रस
  - छंद

# १) भाषण कौशल्य

**भाषण – एकाने अनेकांसमोर सुश्राव्य समजेल असे बोलणे म्हणजे भाषण**

व्यक्ती- व्यक्तीतील मौखिक आंतरप्रक्रीया असते. एक व्यक्ती समूहासमोर बोलत असते. विषय- कालावधी-वेळ यांचे बंधन असते. विशिष्ट हेतू असतो. औपचरिक असते.

**प्रभावी भाषणाचे टप्पे**

- १) विषयाची निवड
- २) मुद्देसुद मांडणी
- ३) प्रयोजनाची निश्च्यती
- ४) श्रोत्याचा अभ्यास
- ५) विषयाची बांधणी व मांडणी
- ६) रूपरेषा / आराखडा
- ७) टाचण
- ८) सराव / कृती

# भाषण

## प्रभावी भाषणाचे तंत्रे

- १) प्रस्तावना (आकर्षक/ थोडक्यात)
- २) मूळ विषयाचा विस्तार(समर्पक /सुटसुटीत वाक्यरचना/मूळ
- विषयाशी सुसंगत घटना प्रसंग)
- 3) समारोप (श्रोते-संयोजकांचे आभार/आवाहन)

# प्रभावी भाषणाची तयारी

- चोफेर वाचन, चिंतन ,मनन ,अनुभव
- स्मरणशक्ती व आत्मविश्वास
- सुसूत्रपणे केलेली मांडणी
- सभाधारिष्ट,मानसिक तयारी
- उत्तम आवाज,चढउतार, रसाळ वाणी
- भाषेवरील प्रभुत्व
- साभिनयाची जोड
- विचारांची सुस्पष्ट मांडणी
- सराव

# काही पथ्ये


**पथ्ये**

- वेळेचे भान ठेवा
- बोजड भाषा टाळा
- पुनरारूत्ती टाळा
- नकारात्मक बोलू नका

- पांडित्य टाळा
- विषयांतर टाळा
- भावना दुखवू नका
- असभ्य बोलू नका

# १.१) संभाषण कौशल्य

- संभाषण- दोन किंवा अधिक व्यक्तींशी बोली भाषेत होणारा संवाद



# संभाषण प्रकार

**प्रत्यक्ष संभाषण**

शिक्षक -विद्यार्थी,
ग्राहक - विक्रेता

**अप्रत्यक्ष संभाषण**

पत्र, मोबाईल,
इमेल, TV

**औपचारिक**

चर्चासत्र, सभा, बँक,

**अनौपचारिक**

मित्र- मैत्रीण,
पती-पत्नी

# संभाषणातील अडथळे









- गोंगाट असणे
- अयोग्य माध्यम वापरणे
- समोरच्याला गृहित धरणे
- कमी एकाग्रहता असणे
- अयोग्य भाषेचा वापर करणे
- लक्षपूर्वक न ऐकणे
- शारीरिक(कान)दोष असणे
- स्वविषयी न्यूनगंड असणे
- आवाज बारीक असणे
- नकारात्मक दृष्टीकोन असणे

# उत्तम संभाषणासाठी उपाय

**लक्षणे – 7 C.S**

| clear | स्पष्ट |
|---|---|
| Concise | थोडक्यात |
| Concrete | ठोस |
| Correct | योग्य |
| Coherent | सुसंगत |
| Complete | पूर्ण |
| Courteous | मोकळेपणा |


# प्रभावी संभाषणासाठी उपाय

- भाषा प्रभुत्व मिळवा
- योग्य उच्चार करा.
- आवाजातील चढ उतार ठेवा.
- शारीरिक कृतींची जोड द्या.
- अवांतर व चौफेर वाचन करा
- चागली भाषणे ऐका
- अयोग्य, वाचन, श्रवण, संवाद टाळा
- चांगल्या लोकांशी संवाद साधा.
- तुमच्या विषयावर चांगल्या लोकांशी चर्चा करा
- चांगल्या आचार विचाराची सवय लावा.
- विचारपूर्वक बोला.
- वेगाने बोलू नका.
- साधे व सोपे शब्द वापरा.
- दुसऱ्यावर व्यर्थ प्रभाव टाकण्यासाठी बोलू नका.
- आत्मविश्वास पूर्वक बोला.



# देहबोली सुधारण्याचे उपाय

- बोलणाऱ्याशी योग्य अंतर ठेवा
- गरज असेल तरच स्पर्श करा
- विनाकारण देखावा (अंगविक्षेप) करू नका
- लोकांनी दिलेल्या चुकीच्या माहितीकडे दुर्लक्ष करा
- डोळ्याकडे बघून बोला
- हसरा चेहरा ठेवा



# २) श्रवण कौशल्य


- श्रवण-पायाभूत कौशल्य
- श्रवण म्हणजे केवळ ऐकणे नाही. किंवा आपोआप घडणारी प्रकिया नाही. श्रवण कौशल्यात आकलन आणि अर्थीकरण या क्रियांना महत्व असते.
- आपण भाषण ऐकतो त्याचा किती भाग लक्षात राहतो यावरून आपली श्रवण क्षमता समजते.
- उदा.

१०० शब्द ऐकले तर किती लक्षात राहतात


- १००% अतिउत्तम
- ७५% उत्तम
- ५०% मध्यम
- २५ % कनिष्ट

- कमीत कमी १०% शब्द लक्षात राहिलेच पाहिजे.

# श्रवण कौशल्याचे फायदे



# श्रवण कौशल्यातील अडथळे





**उच्चार दोष**

- फार भरभर / सावकाश बोलणे
- नकारात्मक बोलणे
- निरर्थक बोलणे
- वरवर बोलणे
- अपरिचित विषय मांडणे
- विचारात सूसुत्रता नसणे

**श्रवण दोष**

- लक्षपूर्वक न ऐकणे
- पूर्वग्रह असणे
- चुकीचा अर्थ घेणे
- आपापसात कुजबूज करणे
- मनस्थिती अस्थिर असणे
- बौद्धिक पातळी कमी असणे


# श्रवण कौशल्य सुधारण्याचे उपाय



# ३) वाचन कौशल्य

- वाचन म्हणजे छापलेल्या मजकुराचा अर्थ लावणे नाही.
- वाचन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. आपण वाचन करतो म्हणजे अक्षरे वाचतो. अक्षरांवरुन शब्दबोध होतो.शब्धाच्या अर्थावरून पूर्वज्ञान,कल्पना,हेतू यांच्या साहाय्याने मजकुराचे आकलन होते.आकलनानंतर महत्वाच्या मुद्याची गुंफण होऊन विचारसूत्र तयार होते.या विचारसूत्राच्या आधारे एकेक भाग क्रमाक्रमाने ग्रहण केला जातो.
- उत्तम वाचन म्हणजे हेतूनुसार,योग्य वेग,आवाज, शब्दउच्चार,आरोह अवरोह,विरामचिन्हे,आघात,आणि अर्थ समजून घेऊन केलेले वाचन होय.

# वाचन कौशल्याचे फायदे



# वाचन कौशल्याचे प्रकार

## आकलन आणि अर्थीकरण

### प्रकट वाचन १

मोठ्या आवाजात वाचन
लेखकाचे विचार वाचकांना सांगणे
वाचक मध्यस्थ असतो
लेखकाच्या हेतूनुसार वाचन
शब्दउच्चार,विरामचिन्हे नुसार
---

### मूक वाचन २

मनातल्या मनात
स्वत:साठी
आनंदासाठी
आकलन महत्वचे
--
--


### अध्ययन प्रवण वाचन ३

विशिष्ट हेतूने केलेले वाचन(परीक्षा,संशोधन)


१. सर्वेक्षण
२. प्रश्नहनिश्चिती
३. विचार
४. मनन
५. उजळणी

**अध्ययन प्रवण वाचन हे उत्तम वाचन होय.**

# वाचन कौशल्यातील अडथळे



# वाचन कौशल्य सुधारण्याचे उपाय



# ४) लेखन कौशल्य

- लेखन म्हणजे आपल्या मनातील विचार दुसऱ्याना सहज समजतील अशा योग्य शब्दात लिहिणे होय.
- **माहितीचे ग्रहण + आकलन = लेखन**

**लेखनाचे महत्व**

- माहिती स्मरणात ठेवण्यासाठी
- माहिती जतन करण्यासाठी
- आत्माविष्कार करण्यासाठी
- माहिती प्रसारित करण्यासाठी
- माहिती पुनरावलोकनासाठी
- स्वयंमूल्यमापनासाठी

# लेखन कौशल्य

## गती
१

- दोनदा वाचन
- सराव
- आराखडा तयार करा

प्रतिमा-प्रतीके

## सुलेखन
२

सुवाच्य लेखन
सरळ,एकसारखे लेखन
योग्य परिच्छेद, समास
शुद्धलेखन नियम
अधोरेखन, रंगीत पेन

चांगले हस्ताक्षर

अचूक शुद्धलेखन

## श्रुतलेखन
३

ऐकलेले जसेच्या तसे लिहीणे
सत्यता
अपप्रयोग नकोत

योग्य विरामचिन्हे

म्हणी-वाक्प्रचार

# लेखन कौशल्य

## लेखनाची अंगे


### बाह्यरचना १
- शब्द
- वाक्य
- परिच्छेद
- शीर्षक
- उपशीर्षक
- शुद्धलेखन

### आशय २
- विषय
- आशय
- भावना
- विचार


### अभिव्यक्ती ३
- निवेदन
- भाषा
- संवाद
- रचना

### सुसंबद्धत्ता ४
- सुसंगती
- तर्कशुद्धता
- मांडणी
- आशयसूत्र
- कथानक
- उपकथानक

# लेखन कौशल्यातील अडचणी



# लेखन कौशल्य सुधारण्याचे उपाय



# परिणामकारक लेखनाची पथ्ये

- १. मुद्द्याची मांडणी योग्य व स्पष्ट असावी.
- २. लेखन शुद्ध असावे.
- ३. भाषा अवघड व बोजड नसावी.
- ४. वाचकाला कळेल अशा सोप्या,सरळ भाषेत लिहावे.
- ५. विचाराची मांडणी सुसंगत असावी.
- ६. विवेचनात सूत्र व संबंध असावा.
- ७. लेखनात नेमकेपणा असावा.

धन्यवाद